

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(श्रेणीबद्ध स्वायत्तताप्राप्त विद्यापीठ)

## दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र

## शैक्षणिक वर्ष २०२६-२७

# प्रवेश माहितीपुस्तिका



# दूरस्थ अध्ययन माध्यम (सत्र पद्धती)


लेखन व संपादन

डॉ. योगेश देशपांडे
शिक्षणक्रम समन्वयक
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र

डॉ. वैभव जाधव
संचालक
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र


ऑनलाईन प्रवेशासाठी

http://unipune.ac.in/CDOE/

प्रवेश प्रक्रियेसाठी संपर्क

student.sol@unipune.ac.in

# दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र

# शैक्षणिक वर्ष २०२६-२७

# शैक्षणिक सत्र जुलै-ऑगस्ट २०२६

## दूरस्थ अध्ययन माध्यम (सत्र पद्धती) प्रवेश माहितीपुस्तिका


| तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|
| १. प्रस्तावना | ३ |
| २. दूरस्थ शिक्षण पद्धती | ३ |
| ३. उपलब्ध अभ्यासक्रम व विषय | ४ |
| ४. प्रवेश पात्रता | ५ |
| ५. प्रवेश शुल्क | ५ |
| ६. प्रवेश प्रक्रिया<br>६.१ ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया<br>६.२ अभ्यास केंद्रावरील प्रवेश प्रक्रिया | <br>६<br>१० |
| ७. प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे | ९ |
| ८. विद्यार्थ्यांसाठी महत्वाच्या सूचना | ११ |
| ९. विषय निवडण्याबाबत सूचना<br>९.१ बी.ए.<br>९.२ बी.ए. गणितशास्त्र<br>९.३ बी.कॉम.<br>९.४ एम.कॉम. | <br>१२<br>१६<br>१८<br>२१ |
| हमीपत्र नमुना<br>परीक्षा अर्जावरील विद्यार्थी माहितीत दुरुस्ती करावयाचा अर्ज | २२<br>२३ |

# १. प्रस्तावना

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठास विद्यापीठ अनुदान आयोगाकडून 'प्रवर्ग-१' दर्जा बहाल करण्यात आला असून विद्यापीठाने 'श्रेणीबद्ध स्वायत्तता' प्राप्त केलेली आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार उच्च शिक्षण देशातील अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ नियमित शिक्षणपद्धतीसोबतच 'दूरस्थ' शिक्षण पद्धती उपलब्ध करून देत आहे.

विद्यापीठाच्या 'दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र' या विभागामार्फत विविध अभ्यासक्रम दूरस्थ अध्ययन पद्धतीने उपलब्ध करून देण्यात आले आहेत. नियमितपणे महाविद्यालयीन शिक्षण घेणे शक्य नसणाऱ्या वर्गासाठी (विशेषतः नोकरदारवर्ग, गृहिणी, जेष्ठ नागरिक, दुर्गम भागातील नागरिक, व्यवसायिक इ.) दूरशिक्षण प्रणालीमुळे उच्च शिक्षणाची दालने खुली झालेली आहेत.

तसेच विद्यार्थ्यांना एकाच वेळेस दोन पदव्या संपादित करण्यास देखील विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिलेली असल्याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये पारंपारिक पद्धतीने अध्ययन करणाऱ्या (नियमित) विद्यार्थ्यांना दूरस्थ माध्यमातून अधिकची एक पदवी मिळविण्याची संधी देखील उपलब्ध झालेली आहे.

# २. 'दूरस्थ' शिक्षण पद्धती

नियमितपणे महाविद्यालयामध्ये जाणे शक्य नसलेल्या विद्यार्थ्यांना उच्चशिक्षण घेणे हे 'दूरस्थ अध्ययन' पद्धतीमुळे सुलभ झालेले आहे. 'दूरस्थ अध्ययन' पद्धतीने प्राप्त पदवी ही नियमित महाविद्यालयांमध्ये जाऊन प्राप्त केलेल्या पदवीस समकक्ष असल्याचे विद्यापीठ अनुदान आयोग (UGC), नवी दिल्ली यांचे द्वारे जाहीर करण्यात आले आहे.

दूरस्थ शिक्षण पद्धतीमध्ये विद्यार्थ्यास प्रवेशासाठी ऑनलाईन प्रवेश व परीक्षा अर्ज भरून, एक अभ्यास केंद्र निवडून अभ्यास केंद्रावर परीक्षा अर्ज जमा करणे आवश्यक आहे. सदर अभ्यास केंद्रामधून विद्यार्थ्यास अध्ययनासाठी पाठ्यक्रमानुसार लिहिलेले अभ्यास साहित्य (पुस्तके) उपलब्ध होते. तसेच प्राध्यापकांचे मार्गदर्शनदेखील उपलब्ध होते. विद्यार्थ्यांचे अंतर्गत मूल्यमापन संबंधित अभ्यास केंद्रावर पूर्ण होते, तर सत्र परीक्षा ही संबंधित अभ्यास केंद्रावर अथवा अन्य महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात येते.

## ३. उपलब्ध अभ्यासक्रम व विषय

दूरस्थ अध्ययन माध्यमातून पदवी स्तरावर बी.ए. व बी.कॉम. आणि पदव्युत्तर स्तरावर एम.ए., एम.कॉम. व एम.बी.ए. हे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. सदर अभ्यासक्रमांमध्ये पुढीलप्रमाणे विषय उपलब्ध आहेत:

१) बी.ए. (Bachelor of Arts):

**विशेषस्तर** – मराठी / इंग्रजी / हिंदी / संस्कृत / इतिहास / अर्थशास्त्र / राज्यशास्त्र / लोकप्रशासन / समाजशास्त्र

**सामान्यस्तर** – मराठी / इंग्रजी / हिंदी / संस्कृत / इतिहास / अर्थशास्त्र / राज्यशास्त्र / लोकप्रशासन / समाजशास्त्र / भूगोलशास्त्र / शिक्षणशास्त्र

२) बी.ए. गणितशास्त्र (Bachelor of Arts in Mathematics):

विशेषस्तर आणि सामान्यस्तरावर गणितशास्त्र हा विषय लागू राहील.

३) बी.कॉम. (Bachelor of Commerce):

**विशेषस्तर विषय** – Business Administration / Banking and Finance / Business Law & Practices / Cost and Works Accounting / Business Entrepreneurship / Marketing Management / Insurance, Transport and Tourism

४) एम.ए. (Master of Arts):

एम.ए. अभ्यासक्रमामध्ये मराठी, हिंदी, संस्कृत, इंग्रजी, इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, तत्वज्ञान आणि शिक्षणशास्त्र हे विषय उपलब्ध आहेत. संस्कृत विषयासाठी अध्ययनाचे माध्यम मराठी असून इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, तत्वज्ञान आणि शिक्षणशास्त्र या विषयांसाठी अध्ययनाचे माध्यम मराठी तसेच इंग्रजीदेखील उपलब्ध आहे.

५) एम.कॉम. (Master of Commerce):

**विशेषस्तर विषय** – Advanced Accounting & Taxation / Commercial Laws & Practices / Advanced Cost Accounting & Cost system / Co-operation & Rural Development / Business Practices & Environment / Business Administration / Advanced Banking & Finance / Advanced Marketing

६) एम.बी.ए. (Master of Business Administration):

**विशेषस्तर विषय** –

**Major & Minor Specialization:** Human Resource Management / Marketing Management / Financial Management / Entrepreneurship Management / Project Management / International Business Management / Operation & Supply Chain Management / Business Analytics

**Only Minor Specialization:** Pharma & Healthcare Management / Tourism and Hospitality Management / Digital Marketing / Banking Management

## ४. प्रवेश पात्रता

**बी.ए. / बी.कॉम. अभ्यासक्रम प्रवेशाकरिता प्रवेश पात्रता पुढीलप्रमाणे आहे:**

१) इंग्रजी विषयासह उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२वी) किंवा समकक्ष

२) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता१०वी) नंतर महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांची ३ वर्षांची पदविका (डिप्लोमा) किंवा समकक्ष

३) महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषद यांची इंग्रजी विषयासह पदविका

४) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता१०वी) नंतर किमान २ वर्ष कालावधीचे औद्योगिक प्रशिक्षण प्रमाणपत्र (I.T.I. Certificate)

**एम.ए. / एम.कॉम. अभ्यासक्रम प्रवेशाकरिता प्रवेश पात्रता पुढीलप्रमाणे आहे:**

मान्यताप्राप्त विद्यापीठामधून किमान ३ वर्षांची पदवी (Bachelor Degree) परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थी एम.ए. प्रवेशाकरिता पात्र आहेत.

**एम. बी.ए. अभ्यासक्रम प्रवेशाकरिता प्रवेश पात्रता पुढीलप्रमाणे आहे:**

i. मान्यताप्राप्त विद्यापीठामधून किमान ३ वर्षांची पदवी (Bachelor Degree) अथवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

ii. कोणतीही पदवी परीक्षा किमान ५०% (महाराष्ट्रातील राखीव प्रवार्गामधील आणि दिव्यांग उमेदवारांकारीता ४५%) गुणांसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**टीप:** दूरस्थ अध्ययन माध्यमातून कोणत्याही अभ्यासक्रमास केवळ भारतीय नागरिकांनाच प्रवेश घेण्यास मुभा आहे. दूरस्थ अध्ययन माध्यमातून प्रवेश घेण्यासाठी कोणतीही वयोमर्यादा नाही. एम.बी.ए. वगळता अन्य अभ्यासक्रमास कमाल प्रवेश क्षमता लागू नाही. एम.बी.ए. अभ्यासक्रमासाठी प्रवेश क्षमता ३६० इतकी असून विद्यापीठाद्वारे घेण्यात येणाऱ्या प्रवेश परीक्षेतील गुणांच्या आधारे नियमानुसार प्रवेश देण्यात येतील. त्यानंतर जागा रिक्त राहिल्यास प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर प्रवेश दिले जातील.

## ५. प्रवेश शुल्क

बी.ए. / बी.कॉम. या शिक्षणक्रमाच्या प्रथम वर्षाचे शुल्क महाराष्ट्रातील शिक्षण मंडळाच्या विद्यार्थ्यांकरिता रु. ७८५०/- व महाराष्ट्राबाहेरील शिक्षण मंडळाच्या विद्यार्थ्यांकरिता रु. ८६७०/- इतके आहे. एम.ए. शिक्षणक्रमाच्या प्रथम वर्षाचे शुल्क महाराष्ट्रातील विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांकरिता रु. ८३००/- व महाराष्ट्राबाहेरील विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांकरिता रु. ९१२०/- इतके आहे. एम.कॉम. शिक्षणक्रमाच्या प्रथम वर्षाचे शुल्क महाराष्ट्रातील विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांकरिता रु. ८९५०/- व महाराष्ट्राबाहेरील विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांकरिता रु. ९८००/- इतके आहे. एम.बी.ए. शिक्षणक्रमाच्या प्रथम सत्राचे शुल्क महाराष्ट्रातील विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांकरिता रु. १८,८०५/- व महाराष्ट्राबाहेरील विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांकरिता रु. २०,६०५/- इतके आहे.

सदर शुल्क हे प्रवेश घेतेवेळी ऑनलाईन पद्धतीने भरायचे आहे. सदर शुल्कामध्ये नोंदणी शुल्क, शिकवणी शुल्क, पात्रता शुल्क, अभ्यास-साहित्य शुल्क, अभ्यासकेंद्र शुल्क व नियमित परीक्षा शुल्क यांचा समावेश असल्याने प्रवेशावेळी ऑनलाईन पद्धतीने प्रवेश शुल्क भरल्यानंतर इतर कोणतेही शुल्क भरण्याची किंवा नियमित परीक्षेसाठी वेगळा परीक्षा अर्ज भरण्याची आवश्यकता नाही.

# ६. प्रवेश प्रक्रिया

## ६.१) ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया:

प्रवेश प्रक्रियेसाठी https://unipune.ac.in/cdoe/admissionjuly2026.html हे संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले आहे. प्रवेश प्रक्रियेमधील टप्पे पुढीलप्रमाणे आहेत:

**१) APAR-ID (ABC-ID):**

प्रवेश अर्ज भरण्यासाठी प्रथमत: APAR-ID (ABC-ID) तयार करायचा आहे. सदर आयडी ABC संकेतस्थळावरून तयार करता येत असून सदर संकेतस्थळाची लिंक प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावर देण्यात आली आहे. मोबाईलमध्ये DigiLocker ॲप वापरून देखील सदर आयडी तयार करता येईल. तथापि, यापूर्वी APAR-ID (ABC-ID) तयार केला असल्यास तो वापरायचा आहे. (पुन्हा APAR-ID तयार करण्याची आवश्यकता नाही)

**२) DEB-ID:**


त्यांनतर DEB-ID तयार करायचा आहे. सदर आयडी तयार करण्याची लिंक प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावर देण्यात आली आहे. त्यावर आवश्यक तपशील भरून DEB-ID तयार करता येईल. तथापि, यापूर्वी DEB-ID तयार केला असल्यास तो वापरायचा आहे. (पुन्हा DEB-ID तयार करण्याची आवश्यकता नाही)

**३) नावनोंदणी (Registration):**

नावनोंदणी करण्याची लिंक प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावर देण्यात आली आहे. सदर लिंकवर आवश्यक तपशील भरून प्रवेश घ्यावयाच्या शिक्षणक्रमाचे नाव (Program) निवडायचे आहे. त्यानंतर स्वत:चा ई-मेल आयडी आणि स्वत:चा मोबाईल क्रमांक भरावा. Verify बटनावर क्लिक करून मोबाईल व ई-मेलआयडीवर आलेला OTP भरावा आणि Create Account वर क्लिक करावे आणि पासवर्ड तयार करून घ्यावा. यापूर्वी दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र (पूर्वीचे मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळा) येथे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा प्रथम वर्षास प्रवेश घ्यावयाचा असल्यास त्यांनी देखील पुन्हा नावनोंदणी करणे आवश्यक आहे.

ऑनलाईन नावनोंदणी करतेवेळी विद्यार्थ्यांनी दिलेल्या मोबाईल क्रमांकावर व ई-मेल आयडीवर विद्यापीठाकडून व अभ्यास केंद्राकडून संदेश (message) येत असल्याने नावनोंदणी करतेवेळी स्वतःचा मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी वापरावा.

नावनोंदणी वैधता कालावधी बी.ए. / बी.कॉम विद्यार्थ्यांसाठी ६ वर्षे आणि एम.ए., एम.कॉम. व एम.बी.ए. विद्यार्थ्यांसाठी ४ वर्षे इतका राहील. सदर कालावधीमध्ये अभ्यासक्रम पूर्ण न झाल्यास (सर्व विषय उत्तीर्ण न झाल्यास) अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यास नव्याने नावनोंदणी करून पुन्हा प्रथम वर्षास प्रवेश घेणे अनिवार्य राहील.



≡ Centre for Distance and Online Education

Create Account

- Do not open this website in multiple tabs in same browser to avoid difficulties in account/profile creation.
- Do not create new account if you have created account in previous session.
- Only one account per student is allowed.
- For account creation use your valid **Email Id** and **Mobile Number.**
- Provide your valid **Email Id** and **Mobile Number** because an **OTP** will be sent to **verify** your Email Id and Mobile Number.
- Both Email Id and Mobile Number will be used for **communication purpose.**
- **Kindly use the Email ID and Mobile Number provided during registration.**
- If you forgot Email ID and Mobile number contact to **CSPSupport@pun.unipune.ac.in / 020-71533899 (SPPU Edutech Foundation)**

Nationality (राष्ट्रीयत्व)* | Indian

state (राज्य)* | -- Select State --

PAN Number/Voter ID/Aadhar Number* | ---Select---


Program* | -- Select Course --

Email Id (ई-मेल आयडी) * | Enter Email Id

Mobile Number (मोबाईल क्र.) * | Enter Mobile Number

Verify Email and Mobile No. | Cancel

I already have an account? Login



Enter **Email OTP** and **Mobile OTP** below to verify.

Email OTP (ईमेल OTP) * | Enter Email OTP

Resend Email OTP in **10:36** minutes.

Mobile OTP (मोबाईल OTP) * | Enter Mobile OTP

Resend Mobile OTP in **10:36** minutes.

Choose Password (पासवर्ड निवडा) * | Enter Password

Show Password

Confirm Password (पासवर्डची पुष्टी करा) * | Enter Password Again

Show Password

50821

Refresh Captcha

Enter captcha text as shown in image * | Enter Captcha Text

Create Account | Cancel

४) प्रवेश अर्ज

नावनोंदणी पूर्ण झाल्यावर प्रवेश अर्ज भरण्यासाठी त्याच वेबपेजवर Student : Log In येथे क्लिक करावे किंवा प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावर दिलेल्या प्रवेश अर्जाच्या लिंकवर क्लिक करावे. मोबाईल क्रमांक किंवा ई-मेल आयडी आणि पासवर्ड वापरून लॉग इन करावे. त्यानंतर प्रवेश अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरावयाचा आहे. पासवर्ड विसरल्यास **Forgot Password** वर क्लिक करून नवीन पासवर्ड तयार करून घ्यावा. लॉगीन केल्यानंतर पुढीलप्रमाणे अर्ज भरावा:

- New Course Enrollment वर क्लिक करावे.
- Student Type मध्ये New निवडावे आणि Program Type, Program Name व माध्यम निवडावे.
- एम.ए. अभ्यासक्रमास प्रवेश घेत असल्यास विशेष स्तरावरील विषय (Specialization) निवडावा.
  (एम.ए. अभ्यासक्रमास अर्ज भरतेवेळी निवडलेला विषय बदलता येणार नाही, विषय बदलायचा असल्यास प्रवेश रद्द करून प्रवेशाच्या मुदतीत पुन्हा नवीन प्रवेश अर्ज भरणे आवश्यक राहील.)
- पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक यामधील ज्या जिल्ह्यातील अभ्यास केंद्रावर प्रवेश घ्यावयाचा आहे, तो जिल्हा निवडावा आणि पुढे ज्या अभ्यास केंद्रावर प्रवेश घ्यायचा आहे, त्या अभ्यास केंद्राचे नाव निवडावे.
  (दूरस्थ अध्ययन पद्धतीमध्ये प्रवेश घेतेवेळी विद्यार्थ्यास एक अभ्यासकेंद्र निवडायचे आहे. विद्यापीठाने पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमध्ये 'दूरशिक्षण' अभ्यासकेंद्रे उपलब्ध करून दिलेली आहेत. ऑनलाईन प्रवेश अर्जामध्ये अभ्यासकेंद्रांची यादी उपलब्ध आहे. प्रवेश अर्ज भरतेवेळी विद्यार्थ्यास अभ्यास केंद्रांच्या यादीमधून त्याच्या सोयीचे कोणतेही एक अभ्यासकेंद्र निवडता येईल.)
- इयता १०वी / माध्यमिक शालांत परीक्षा / उत्तीर्ण झालेल्या समकक्ष परीक्षेचा तपशील भरावा.
- इयता १२वी / उच्चमाध्यमिक परीक्षा / पदविका (डिप्लोमा) / प्रमाणपत्र (ITI) / उत्तीर्ण झालेल्या समकक्ष परीक्षेचा तपशील भरावा.
- यापूर्वी पदवी परीक्षा उत्तीर्ण असल्यास त्याचा तपशील भरावा. (यापूर्वी एकापेक्षा अधिक पदव्या मिळाल्या असल्यास कोणत्याही एका पदवीचा तपशील भरावा, तथापि, सदर पदवी किमान ३ वर्ष कालावधीची असावी.)
- त्यानंतर Save बटनवर क्लिक करावे.
- पुढे अर्जामध्ये DEB-ID भरावा आणि Save & Next वर क्लिक करावे.
- त्यानंतर फोटो व सही अपलोड करावी. (ऑनलाईन प्रवेश अर्ज भरतेवेळी इतर कोणतीही कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करण्याची आवश्यकता नाही.)
- त्यानंतर परीक्षा अर्ज भरावा. अर्जामध्ये विषय काळजीपूर्वक निवडावेत.

- पुढे प्रवेश शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरावे. (ऑनलाईन प्रवेश शुल्क भरतेवेळी बँक अकाउंटमधून पैसे वजा झाले असतील (transaction successful) आणि प्रवेश अर्ज (PDF) डाउनलोड होत नसेल तर पुन्हा शुल्क भरू नये (Double Payment करू नये) आणि student.sol@unipune.ac.in या इ-मेलआयडीवर त्वरित पुढील तपशील पाठविण्यात यावा:

  बँकेचे नाव, transaction ID आणि पेमेंट पद्धती- कार्ड / UPI / नेटबँकिंग)
- प्रवेश शुल्क भरल्यानंतर Exam Form Print आणि Admission Payment Receipt वर क्लिक करून परीक्षा अर्ज व प्रवेश शुल्क पावती डाउनलोड करून घ्यावी. प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर सदर फाईल डाउनलोड करणे शक्य नसल्याने सदर दोन्ही PDF File आणि त्यांची छापील प्रत (print) अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत जपून ठेवायची आहे.

### ६.२) अभ्यासकेंद्रावरील प्रवेश प्रक्रिया:

प्रवेश शुल्क भरल्यानंतर डाउनलोड केलेल्या परीक्षा अर्ज व प्रवेश शुल्क पावती यांची छापील प्रत आवश्यक त्या कागदपत्रांसह ऑनलाईन अर्जामध्ये निवडलेल्या अभ्यासकेंद्रावर कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत लवकरात लवकर जमा करायची आहे. अभ्यासकेंद्रावर आवश्यक त्या कागदपत्रांसह प्रवेश अर्ज जमा केल्यानंतरच प्रवेश निश्चित होईल. परीक्षा अर्ज व आवश्यक कागदपत्रे सोमवार दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंतच जमा करता येतील. तरी, सदर मुदतीमध्ये अभ्यासकेंद्रावर परीक्षा अर्ज जमा करणे आवश्यक आहे. सदर मुदतीमध्ये अभ्यासकेंद्रावर परीक्षा अर्ज जमा न केल्यास प्रवेश अर्ज रद्द होईल आणि प्रवेश निश्चित होणार नाही.

## ७. प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे

ऑनलाईन प्रवेश अर्ज भरतेवेळी कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करण्याची आवश्यकता नाही. परंतु, ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर अभ्यासकेंद्रावर प्रवेश अर्ज जमा करतेवेळी पुढील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे:

१) परीक्षा अर्ज (२ प्रती)

२) प्रवेश शुल्क पावती (College/Study Centre Copy अभ्यास केंद्रामध्ये जमा करावी आणि Student Copy वर अभ्यास केंद्राचा शिक्का घेऊन स्वत:कडे जपून ठेवावी.)

३) आधारकार्ड (मूळ प्रत सोबत ठेवावी व झेरॉक्सप्रत अभ्यास केंद्रामध्ये जमा करावी)

४) माध्यमिक शिक्षण (इयत्ता १०वीचे) प्रमाणपत्र (मूळ प्रत सोबत ठेवावी व झेरॉक्सप्रत जमा करावी)

५) पात्रता परीक्षेचे गुणपत्रक (मूळ प्रत सोबत ठेवावी व झेरॉक्सप्रत जमा करावी)

(टीप: बी.ए., बी.कॉम. या वर्गांमध्ये प्रवेश घेण्यासाठी इयत्ता १२वी / डिप्लोमा / ITI प्रमाणपत्र / समकक्ष परीक्षेचे गुणपत्रक आणि एम.ए., एम.कॉम.,एम.बी.ए. या वर्गांमध्ये प्रवेश घेण्यासाठी पदवी परीक्षेचे गुणपत्रक)

६) विद्यार्थ्याच्या नावामध्ये बदल झालेला असल्यास त्याबाबतचा पुरावा (मूळ प्रत सोबत ठेवावी व झेरॉक्सप्रत जमा करावी)

७) पुढीलपैकी एक कागदपत्र (जे लागू असेल ते) (मूळ प्रत):

i) याआधीचा प्रवेश महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न शाळा / कनिष्ठ महाविद्यालयात नियमित विद्यार्थी म्हणून घेतला असेल तर शाळा सोडल्याचा दाखला (Leaving Certificate) आवश्यक आहे.

ii) याआधीचा प्रवेश सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात अथवा विद्यापीठ विभागात नियमित किंवा बहिःस्थ विद्यार्थी म्हणून घेतला असेल तर, संबंधित विभागाचे स्थानांतर प्रमाणपत्र (Transfer Certificate) आवश्यक आहे.

iii) याआधीचा प्रवेश महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामध्ये बहिःस्थ (खाजगी) विद्यार्थी म्हणून घेतला असेल किंवा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाव्यतिरिक्त इतर कोणत्याही शिक्षण मंडळामध्ये घेतला असेल तर संबंधित शिक्षण मंडळाचे स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) आवश्यक आहे. याआधीचा प्रवेश सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाव्यतिरिक्त इतर कोणत्याही विद्यापीठामध्ये किंवा इतर विद्यापीठ संलग्न महाविद्यालयामध्ये घेतला असेल तर संबंधित विद्यापीठाचे स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) आवश्यक आहे.

iv) विद्यार्थी सध्या अन्य ठिकाणी प्रवेशित असल्यास (दुहेरी पदवीसाठी) संबंधित महाविद्यालयाचे अथवा विद्यापीठाचे बोनाफाइड प्रमाणपत्र आवश्यक आहे.

v) याआधीचा प्रवेश सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या 'दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र (मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळा)' या विभागामध्ये घेतला असेल तर स्थानांतर प्रमाणपत्र (Transfer Certificate) आवश्यक नाही. अशा विद्यार्थ्यांनी दूरस्थ अभ्यासक्रमाच्या गुणपत्रिकेची प्रत जमा करावी. (विद्यार्थ्याने अभ्यास केंद्र बदलले असेल तरीही स्थानांतर प्रमाणपत्र (TC) आवश्यक नाही.)

- अभ्यासकेंद्रावर परीक्षा अर्ज जमा करतेवेळी विद्यार्थ्याकडे शाळा सोडल्याचा दाखला / स्थानांतर / स्थलांतर / बोनाफाइड प्रमाणपत्र (Leaving / Transfer / Migration / Bonafide Certificate) नसेल तर विद्यार्थ्याने प्रवेश अर्जासोबत विहित नमुन्यातील हमीपत्र देणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र अभ्यास केंद्रावर जमा केल्यानंतरच विद्यार्थ्याचा प्रवेश निश्चित होईल.

- अभ्यास केंद्रावर परीक्षा अर्ज जमा करण्यापूर्वी विद्यार्थ्याने प्रवेश अर्जातील वैयक्तिक तपशील (नाव, मोबाईल क्रमांक, इ-मेल आयडी, पत्ता, इ.) काळजीपूर्वक तपासून पाहणे आवश्यक आहे. यामध्ये काही दुरुस्ती करावयाची असल्यास विहित नमुन्यातील अर्ज प्रवेश अर्जासोबत अभ्यास केंद्रावर जमा करणे आवश्यक आहे.

- **परीक्षा अर्ज (छापील प्रत) तसेच आवश्यक कागदपत्रे अभ्यास केंद्रामध्ये मुदतीत जमा न केल्यास प्रवेश निश्चित होणार नाही, याची प्रथम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

## ८. विद्यार्थ्यांसाठी महत्वाच्या सूचना

१) अभ्यास केंद्रामध्ये परीक्षा अर्ज व प्रवेश शुल्क पावती जमा केल्यानंतर त्यांच्या एका प्रतीवर अभ्यास केंद्राकडून शिक्का घेऊन सदर प्रत संपूर्ण अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत काळजीपूर्वक जतन करून ठेवावी.

२) प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अभ्यास केंद्राद्वारे सर्व विद्यार्थ्यांना Whatsapp / Telegram ग्रुपमध्ये समाविष्ट करण्यात येईल आणि पाठ्यक्रम, नोंदणी क्रमांक (PRN), अभ्यास साहित्य (पुस्तके), अंतर्गत मूल्यमापन (स्वाध्याय), सत्रांत परीक्षा इ. बाबतच्या पुढील सूचना सदर ग्रुपमध्ये वेळोवेळी देण्यात येतील. अभ्यास केंद्राच्या सदर ग्रुपमध्ये समाविष्ट असल्याबाबतची खात्री विद्यार्थ्यांनी करून घ्यावी आणि ग्रुपमध्ये वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचना काळजीपूर्वक पहाव्यात.

३) प्रवेश प्रक्रिया, परीक्षा, निकाल इत्यादीबाबतच्या वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचनांसाठी विद्यार्थ्याने www.unipune.ac.in/CDOE/ या संकेतस्थळास नियमितपणे भेट देणे आवश्यक आहे.

४) प्रवेश प्रक्रियेदरम्यान काही मदत हवी असल्यास विद्यार्थ्यांना 020-25622386 या दूरध्वनी क्रमांकावर किंवा student.sol@unipune.ac.in या ई-मेल आयडीवर संपर्क करता येईल. तसेच विद्यार्थ्यांना अभ्यास केंद्रावरदेखील प्रवेश प्रक्रियेबाबत मार्गदर्शन उपलब्ध होईल.

# ९.१ विषय निवडण्याबाबत सूचना – बी.ए.

## प्रथम वर्ष बी.ए.

F.Y.B.A. Semester-I

| Code | Subject | Credits |
|---|---|---|
| Compulsory Subjects: | | |
| 111 - I | Compulsory English - I | 3 |
| Any One of the following: | | |
| 112 - I | Marathi - I | 3 |
| 113 - I | Hindi - I | 3 |
| 114 - I | Sanskrit - I | 3 |
| 115 - I | Optional English - I | 3 |
| Any 4 of the following: | | |
| 116 - I | Education - I | 3 |
| 117 - I | Economics - I | 3 |
| 118 - I | Political Science - I | 3 |
| 119 - I | History - I | 3 |
| 120 - I | Public Administration - I | 3 |
| 123 – I | Sociology – I | 3 |
| 124 – I | Geography – I | 3 |
| Compulsory Add-On Subject: | | |
| AOC 1 | Human Rights | 4 |

F.Y.B.A. Semester-II

| Code | Subject | Credits |
|---|---|---|
| Compulsory Subjects: | | |
| 111 - II | Compulsory English - II | 3 |
| One of the following: | | |
| 112 - II | Marathi - II | 3 |
| 113 - II | Hindi - II | 3 |
| 114 - II | Sanskrit - II | 3 |
| 115 - II | Optional English - II | 3 |
| 4 of the following: | | |
| 116 - II | Education - II | 3 |
| 117 - II | Economics - II | 3 |
| 118 - II | Political Science - II | 3 |
| 119 - II | History - II | 3 |
| 120 - II | Public Administration – II | 3 |
| 123 – II | Sociology – II | 3 |
| 124 – II | Geography – II | 3 |
| Compulsory Add-On Subject: | | |
| AOC 2 | Cyber Security | 4 |

प्रथम सत्रास निवडलेले वैकल्पिक विषय द्वितीय सत्रास देखील लागू राहतील. प्रथम वर्षास Optional English हा विषय निवडला असेल तरच द्वितीय वर्ष बी.ए. या वर्गामध्ये इंग्रजी विषय हा विशेष स्तरावर निवडता येईल. संस्कृत या विषयासाठी पुस्तके व परीक्षा यांचे माध्यम फक्त मराठी आहे (संस्कृत या विषयासाठी इंग्रजी माध्यम उपलब्ध नाही).

द्वितीय वर्ष बी.ए.

S.Y.B.A. Semester-III

| Code | Subject | Credits |
|---|---|---|
| Compulsory Subjects: | | |
| AECC – I | Environmental Studies | 2 |
| CC-A – I | Compulsory English | 3 |
| Any One of the following: | | |
| EC – I | English Communication | 2 |
| MIL 1 – I | Marathi Language | 2 |
| MIL 2 – I | Hindi Language | 2 |
| Three of the following: | | |
| SEC1-A – I | English | 3 |
| SEC1-D – I | Sanskrit | 3 |
| SEC1-K – I | Sociology | 3 |
| CC-B – I | Marathi | 3 |
| CC-C – I | Hindi | 3 |
| CC-E – I | History | 3 |
| CC-G – I | Economics | 3 |
| CC-H – I | Political Science | 3 |
| CC-J – I | Public Administration | 3 |
| CC-M - I | Education | 3 |
| CC-P - I | Geography | 3 |
| One group from the following: | | |
| DSE1-A - I | English | 3 |
| DSE2-A - I | | 3 |
| SEC2-A - I | | 2 |
| DSE1-B - I | Marathi | 3 |
| DSE2-B - I | | 3 |
| SEC2-B - I | | 2 |
| DSE1-C - I | Hindi | 3 |
| DSE2-C - I | | 3 |
| SEC2-C - I | | 2 |
| DSE1-D - I | Sanskrit | 3 |
| DSE2-D - I | | 3 |
| SEC2-D - I | | 2 |
| DSE1-E - I | History | 3 |
| DSE2-E - I | | 3 |
| SEC2-E - I | | 2 |
| DSE1-G - I | Economics | 3 |
| DSE2-G - I | | 3 |
| SEC2-G - I | | 2 |
| DSE1-H - I | Political Science | 3 |
| DSE2-H - I | | 3 |
| SEC2-H - I | | 2 |
| DSE1-J - I | Public Administration | 3 |
| DSE2-J - I | | 3 |
| SEC2-J - I | | 2 |
| DSE1-K - I | Sociology | 3 |
| DSE2-K - I | | 3 |
| SEC2-K - I | | 2 |
| Compulsory Add-On Subject: | | |
| AOC 3 | Introduction to Constitution | 2 |

S.Y.B.A. Semester-IV

| Code | Subject | Credits |
|---|---|---|
| Compulsory Subjects: | | |
| AECC – II | Environmental Studies | 2 |
| CC-A – II | Compulsory English | 3 |
| One of the following: | | |
| EC – II | English Communication | 2 |
| MIL 1 – II | Marathi Language | 2 |
| MIL 2 – II | Hindi Language | 2 |
| Three of the following: | | |
| SEC1-A – II | English | 3 |
| SEC1-D – II | Sanskrit | 3 |
| SEC1-K – II | Sociology | 3 |
| CC-B – II | Marathi | 3 |
| CC-C – II | Hindi | 3 |
| CC-E – II | History | 3 |
| CC-G – II | Economics | 3 |
| CC-H – II | Political Science | 3 |
| CC-J – II | Public Administration | 3 |
| CC-M - II | Education | 3 |
| CC-P - II | Geography | 3 |
| One group from the following: | | |
| DSE1-A - II | English | 3 |
| DSE2-A - II | | 3 |
| SEC2-A - II | | 2 |
| DSE1-B - II | Marathi | 3 |
| DSE2-B - II | | 3 |
| SEC2-B - II | | 2 |
| DSE1-C - II | Hindi | 3 |
| DSE2-C - II | | 3 |
| SEC2-C - II | | 2 |
| DSE1-D - II | Sanskrit | 3 |
| DSE2-D - II | | 3 |
| SEC2-D - II | | 2 |
| DSE1-E - II | History | 3 |
| DSE2-E - II | | 3 |
| SEC2-E - II | | 2 |
| DSE1-G - II | Economics | 3 |
| DSE2-G - II | | 3 |
| SEC2-G - II | | 2 |
| DSE1-H - II | Political Science | 3 |
| DSE2-H - II | | 3 |
| SEC2-H - II | | 2 |
| DSE1-J - II | Public Administration | 3 |
| DSE2-J - II | | 3 |
| SEC2-J - II | | 2 |
| DSE1-K - II | Sociology | 3 |
| DSE2-K - II | | 3 |
| SEC2-K - II | | 2 |

द्वितीय वर्ष बी.ए.

- सत्र-३ मध्ये निवडलेले वैकल्पिक विषय सत्र-४मध्ये देखील लागू राहतील. Environmental Studies आणि Compulsory English हे दोन्ही विषय अनिवार्य आहेत.
- English Communication, Marathi Language आणि Hindi Language यापैकी कोणताही १ विषय निवडता येईल.
- 'SEC1' आणि 'CC' या विषय गटामध्ये English / Sanskrit / Sociology / Marathi / Hindi / History / Economics / Political Science / Public Administration / Education / Geography यापैकी तीन विषय निवडायचे आहेत. जो विषय विशेष स्तरावर निवडायचा आहे, तो विषय या गटामध्ये निवडणे अनिवार्य राहील. प्रथम वर्षास निवडलेल्या विषयांमधूनच या गटातील ३ विषय निवडता येतील.
- 'DSE1, DSE2, SEC2' हा विशेष स्तरावील विषय गट राहील. विशेष स्तरावर English / Marathi / Hindi / Sanskrit / History / Economics / Political Science / Public Administration / Sociology हे विषय उपलब्ध आहेत. प्रथम वर्षास निवडलेल्या विषयांमधूनच कोणत्याही १ विषयाचा गट निवडता येईल. प्रथम वर्षास Optional English हा विषय निवडला असेल तरच English विषय हा विशेष स्तरावर निवडता येईल.
- विशेष स्तरावील गटामध्ये जो विषय निवडलेला आहे, तो विषय 'SEC1' किंवा 'CC' या विषय गटामध्येदेखील निवडणे आवश्यक राहील.
- संस्कृत या विषयासाठी पुस्तके व परीक्षा यांचे माध्यम फक्त मराठी आहे (इंग्रजी माध्यम उपलब्ध नाही).

## तृतीय वर्ष बी.ए.

T.Y.B.A. Semester-V

| Code | Subject | Credits |
|---|---|---|
| Compulsory Subjects: | | |
| GE - I | Generic Elective | 2 |
| CC2-A - I | Compulsory English | 3 |
| Three of the following: | | |
| SEC3-A - I | English | 3 |
| SEC3-D - I | Sanskrit | 3 |
| SEC3-K - I | Sociology | 3 |
| CC2-B - I | Marathi | 3 |
| CC2-C - I | Hindi | 3 |
| CC2-E - I | History | 3 |
| CC2-G - I | Economics | 3 |
| CC2-H - I | Political Science | 3 |
| CC2-J - I | Public Administration | 3 |
| CC2-M - I | Education | 3 |
| CC2-P - I | Geography | 3 |
| One group from the following: | | |
| DSE3-A - I | English | 3 |
| DSE4-A - I | | 3 |
| SEC4-A - I | | 2 |
| DSE3-B - I | Marathi | 3 |
| DSE4-B - I | | 3 |
| SEC4-B - I | | 2 |
| DSE3-C - I | Hindi | 3 |
| DSE4-C - I | | 3 |
| SEC4-C - I | | 2 |
| DSE3-D - I | Sanskrit | 3 |
| DSE4-D - I | | 3 |
| SEC4-D - I | | 2 |
| DSE3-E - I | History | 3 |
| DSE4-E - I | | 3 |
| SEC4-E - I | | 2 |
| DSE3-G - I | Economics | 3 |
| DSE4-G - I | | 3 |
| SEC4-G - I | | 2 |
| DSE3-H - I | Political Science | 3 |
| DSE4-H - I | | 3 |
| SEC4-H - I | | 2 |
| DSE3-J - I | Public Administration | 3 |
| DSE4-J - I | | 3 |
| SEC4-J - I | | 2 |
| DSE3-K - I | Sociology | 3 |
| DSE4-K - I | | 3 |
| SEC4-K - I | | 2 |

T.Y.B.A. Semester-VI

| Code | Subject | Credits |
|---|---|---|
| Compulsory Subjects: | | |
| GE - II | Generic Elective | 2 |
| CC2-A - II | Compulsory English | 3 |
| Three of the following: | | |
| SEC3-A - II | English | 3 |
| SEC3-D - II | Sanskrit | 3 |
| SEC3-K - II | Sociology | 3 |
| CC2-B - II | Marathi | 3 |
| CC2-C - II | Hindi | 3 |
| CC2-E - II | History | 3 |
| CC2-G - II | Economics | 3 |
| CC2-H - II | Political Science | 3 |
| CC2-J - II | Public Administration | 3 |
| CC2-M - II | Education | 3 |
| CC2-P - II | Geography | 3 |
| One group from the following: | | |
| DSE3-A - II | English | 3 |
| DSE4-A - II | | 3 |
| SEC4-A - II | | 2 |
| DSE3-B - II | Marathi | 3 |
| DSE4-B - II | | 3 |
| SEC4-B - II | | 2 |
| DSE3-C - II | Hindi | 3 |
| DSE4-C - II | | 3 |
| SEC4-C - II | | 2 |
| DSE3-D - II | Sanskrit | 3 |
| DSE4-D - II | | 3 |
| SEC4-D - II | | 2 |
| DSE3-E - II | History | 3 |
| DSE4-E - II | | 3 |
| SEC4-E - II | | 2 |
| DSE3-G - II | Economics | 3 |
| DSE4-G - II | | 3 |
| SEC4-G - II | | 2 |
| DSE3-H - II | Political Science | 3 |
| DSE4-H - II | | 3 |
| SEC4-H - II | | 2 |
| DSE3-J - II | Public Administration | 3 |
| DSE4-J - II | | 3 |
| SEC4-J - II | | 2 |
| DSE3-K - II | Sociology | 3 |
| DSE4-K - II | | 3 |
| SEC4-K - II | | 2 |

Generic Elective आणि Compulsory English हे दोन्ही विषय अनिवार्य आहेत. उर्वरित विषय गटांमध्ये द्वितीय वर्षास निवडलेले विषय निवडता येतील.

## ९.२ विषय निवडण्याबाबत सूचना – बी.ए. गणितशास्त्र

### प्रथम वर्ष बी.ए. गणितशास्त्र

F.Y.B.A. Mathematics Semester-I

| Code | Subject | Credits |
|---|---|---|
| Compulsory Subjects: | | |
| 111 - I | Compulsory English - I | 3 |
| 122A - I | Mathematics Paper I : Algebra | 3 |
| 122B - I | Mathematics Paper II: Calculus - I | 3 |
| 122C - I | Mathematics Paper III: Financial Mathematics - I | 3 |
| Any One of the following: | | |
| 112 - I | Marathi - I | 3 |
| 113 - I | Hindi - I | 3 |
| 114 - I | Sanskrit - I | 3 |
| 115 - I | Optional English - I | 3 |
| Any One of the following: | | |
| 116 - I | Education - I | 3 |
| 117 - I | Economics - I | 3 |
| 118 - I | Political Science - I | 3 |
| 119 - I | History - I | 3 |
| 120 - I | Public Administration - I | 3 |
| 123 – I | Sociology – I | 3 |
| 124 – I | Geography – I | 3 |
| Compulsory Add-On Subject: | | |
| AOC 1 | Human Rights | 4 |

F.Y.B.A. Mathematics Semester-II

| Code | Subject | Credits |
|---|---|---|
| Compulsory Subjects: | | |
| 111 - II | Compulsory English - II | 3 |
| 122A – II | Mathematics Paper I : Analytical Geometry | 3 |
| 122B – II | Mathematics Paper II: Calculus - II | 3 |
| 122C - II | Mathematics Paper III: Financial Mathematics - II | 3 |
| One of the following: | | |
| 112 - II | Marathi - II | 3 |
| 113 - II | Hindi - II | 3 |
| 114 - II | Sanskrit - II | 3 |
| 115 - II | Optional English - II | 3 |
| One of the following: | | |
| 116 - II | Education - II | 3 |
| 117 - II | Economics - II | 3 |
| 118 - II | Political Science - II | 3 |
| 119 - II | History - II | 3 |
| 120 - II | Public Administration – II | 3 |
| 123 – II | Sociology – II | 3 |
| 124 – II | Geography – II | 3 |
| Compulsory Add-On Subject: | | |
| AOC 2 | Cyber Security | 4 |

प्रथम सत्रास निवडलेले वैकल्पिक विषय द्वितीय सत्रास देखील लागू राहतील. संस्कृत या विषयासाठी पुस्तके व परीक्षा यांचे माध्यम फक्त मराठी आहे (संस्कृत या विषयासाठी इंग्रजी माध्यम उपलब्ध नाही). गणितशास्त्र विषयासाठी पुस्तके व परीक्षा यांचे माध्यम फक्त इंग्रजी आहे.

## द्वितीय वर्ष बी.ए. गणितशास्त्र

**S.Y.B.A. Mathematics Semester-III**

| Code | Subject | Credits |
|---|---|---|
| Compulsory Subjects: | | |
| AECC – I | Environmental Studies | 2 |
| CC-A – I | Compulsory English | 3 |
| CC-N1 – I | Graph Theory | 3 |
| CC-N2 – I | Calculus of Several Variables | 3 |
| SEC1-N – I | Operational Research | 3 |
| DSE1-N – I | Problem Course based on CC-N1-I and CC-N2-I | 3 |
| DSE2-N – I | Number Theory | 3 |
| SEC2-N – I | Problem course on use of maxima software for DSE1-N-I & DSE2-N-I | 2 |
| Any One of the following: | | |
| EC – I | English Communication | 2 |
| MIL 1 – I | Marathi Language | 2 |
| MIL 2 – I | Hindi Language | 2 |
| Compulsory Add-On Subject: | | |
| AOC 3 | Introduction to Constitution | 2 |

**S.Y.B.A. Mathematics Semester-IV**

| Code | Subject | Credits |
|---|---|---|
| Compulsory Subjects: | | |
| AECC – II | Environmental Studies | 2 |
| CC-A – II | Compulsory English | 3 |
| CC-N1 – II | Linear Algebra | 3 |
| CC-N2 – II | Vector Calculus | 3 |
| SEC1-N – II | Optimization Techniques | 3 |
| DSE1-N – II | Problem Course based on CC-N1-II and CC-N2-II | 3 |
| DSE2-N – II | Computational Geometry | 3 |
| SEC2-N – II | Problem course on use of maxima software for DSE1-N-II & DSE2-N-II | 2 |
| One of the following: | | |
| EC – II | English Communication | 2 |
| MIL 1 – II | Marathi Language | 2 |
| MIL 2 – II | Hindi Language | 2 |

- सत्र-३ मध्ये English Communication, Marathi Language आणि Hindi Language यापैकी कोणताही १ विषय निवडता येईल. सदर विषय सत्र-४ मध्ये देखील लागू राहील.

## तृतीय वर्ष बी.ए. गणितशास्त्र

**T.Y.B.A. Mathematics Semester-V**

| Code | Subject | Credits |
|---|---|---|
| Compulsory Subjects: | | |
| GE - I | Generic Elective | 2 |
| CC2-A - I | Compulsory English | 3 |
| CC2-N1 – I | Group Theory | 3 |
| CC2-N2 – I | Real Analysis - I | 3 |
| SEC3-N – I | C-Programming | 3 |
| DSE3-N – I | Metric Spaces | 3 |
| DSE4-N – I | Ordinary Differential Equations | 3 |
| SEC4-N – I | LaTeX for Scientific Writing | 2 |

**T.Y.B.A. Mathematics Semester-VI**

| Code | Subject | Credits |
|---|---|---|
| Compulsory Subjects: | | |
| GE - II | Generic Elective | 2 |
| CC2-A - II | Compulsory English | 3 |
| CC2-N1 – II | Ring Theory | 3 |
| CC2-N2 – II | Real Analysis - II | 3 |
| SEC3-N – II | Financial Mathematics | 3 |
| DSE3-N – II | Complex Analysis | 3 |
| DSE4-N – II | Partial Differential Equations | 3 |
| SEC4-N – II | Mathematics into LaTeX | 2 |

## ९.३ विषय निवडण्याबाबत सूचना – बी.कॉम.

### प्रथम वर्ष बी.कॉम.

F.Y.B.Com. Semester-I

| Code | Subject | Credits |
|---|---|---|
| Compulsory Subjects: | | |
| 111 - I | Compulsory English - I | 3 |
| 112 - I | Financial Accounting - I | 4 |
| 113 - I | Business Economics - I | 3 |
| Any One of the following: | | |
| 114A - I | Business Mathematics & Statistics - I | 3 |
| 114B - I | Computer Concepts and Application - I | 3 |
| Any One of the following: | | |
| 115A - I | Organization Skill Development - I | 3 |
| 115B - I | Banking and Finance - I | 3 |
| 115C - I | Commercial Geography - I | 3 |
| 115D - I | Defence Organization & Management in India - I | 3 |
| 115E - I | Theory and Practice of Cooperation - I | 3 |
| 115F - I | Managerial Economics - I | 3 |
| Any One of the following: | | |
| 116A - I | Essentials of E-Commerce - I | 3 |
| 116B - I | Insurance and Transport - I | 3 |
| 116C - I | Marketing and Salesmanship - I | 3 |
| 116D - I | Consumer Protection and Business Ethics - I | 3 |
| 116E - I | Business Environment & Entrepreneurship - I | 3 |
| Any One of the following: | | |
| 117A - I | Additional English - I | 3 |
| 117B - I | Marathi - I | 3 |
| Compulsory Add-On Subject: | | |
| AOC 1 | Human Rights | 4 |

F.Y.B.Com. Semester-II

| Code | Subject | Credits |
|---|---|---|
| Compulsory Subjects: | | |
| 111 - II | Compulsory English - II | 3 |
| 112 - II | Financial Accounting - II | 4 |
| 113 - II | Business Economics - II | 3 |
| One of the following: | | |
| 114A - II | Business Mathematics & Statistics - II | 3 |
| 114B - II | Computer Concepts and Application - II | 3 |
| One of the following: | | |
| 115A - II | Organization Skill Development - II | 3 |
| 115B - II | Banking and Finance - II | 3 |
| 115C - II | Commercial Geography - II | 3 |
| 115D - II | Defence Organization & Management in India - II | 3 |
| 115E - II | Theory and Practice of Cooperation - II | 3 |
| 115F - II | Managerial Economics - II | 3 |
| One of the following: | | |
| 116A - II | Essentials of E-Commerce - II | 3 |
| 116B - II | Insurance and Transport - II | 3 |
| 116C - II | Marketing and Salesmanship - II | 3 |
| 116D - II | Consumer Protection and Business Ethics - II | 3 |
| 116E - II | Business Environment & Entrepreneurship - II | 3 |
| One of the following: | | |
| 117A - II | Additional English - II | 3 |
| 117B - II | Marathi - II | 3 |

प्रथम सत्रास निवडलेला वैकल्पिक विषय द्वितीय सत्रास देखील लागू राहील. प्रथम वर्षास Financial Accounting, Business Mathematics & Statistics, Computer Concepts and Application, Essentials of E-Commerce या विषयाच्या अभ्यास साहित्याचे आणि परीक्षेचे माध्यम फक्त इंग्रजी असेल.

द्वितीय वर्ष बी.कॉम.

S.Y.B.Com. Semester-III

| Code | Subject | Credits |
|---|---|---|
| Compulsory Subjects: | | |
| AECC-I | Environmental Studies - I | 2 |
| 201 - I | Business Communication - I | 4 |
| 202 - I | Corporate Accounting - I | 3 |
| 203 - I | Business Economics (Macro) - I | 3 |
| 204 - I | Business Management - I | 3 |
| 205 - I | Elements of Company Law - I | 3 |
| Any One of the following: | | |
| 206A - I | Business Administration - I(I) | 4 |
| 206B - I | Banking and Finance - I(I) | 4 |
| 206E - I | Cost and Works Accounting - I(I) | 4 |
| 206G - I | Business Entrepreneurship - I(I) | 4 |
| 206K - I | Insurance, Transport and Tourism - I(I) | 4 |
| Compulsory Add-On Subjects: | | |
| AOC 2 | Cyber Security | 4 |
| AOC 3 | Introduction to Constitution | 2 |

S.Y.B.Com. Semester-IV

| Code | Subject | Credits |
|---|---|---|
| Compulsory Subjects: | | |
| AECC - II | Environmental Studies - II | 2 |
| 201 - II | Business Communication - I(II) | 4 |
| 202 - II | Corporate Accounting - I(II) | 3 |
| 203 - II | Business Economics (Macro) - I(II) | 3 |
| 204 - II | Business Management - I(II) | 3 |
| 205 - II | Elements of Company Law - I(II) | 3 |
| Any One of the following: | | |
| 206A - II | Business Administration - I(II) | 4 |
| 206B - II | Banking and Finance - I(II) | 4 |
| 206E - II | Cost and Works Accounting - I(II) | 4 |
| 206G - II | Business Entrepreneurship - I(II) | 4 |
| 206K - II | Insurance, Transport and Tourism - I(II) | 4 |
| Compulsory Subjects: | | |
| VE | Value Education | 1 |
| ESEP | Employability Skill Enhancement Programme | 1 |

द्वितीय वर्षास Business Communication, Corporate Accounting आणि Cost and Works Accounting या विषयाच्या अभ्यास साहित्याचे आणि परीक्षेचे माध्यम फक्त इंग्रजी असेल. सत्र-३ मध्ये निवडलेला वैकल्पिक विषय सत्र- ४, ५ व ६ मध्ये देखील लागू राहील.

T.Y.B.Com. Semester-V

| Code | Subject | Credits |
|---|---|---|
| Compulsory Subjects: | | |
| 301 - I | Business Regulatory Framework - I | 3 |
| 302 - I | Advanced Accounting - I | 3 |
| 303 - I | Indian and Global Economic Development - I | 3 |
| 304 - I | Auditing & Taxation - I | 4 |
| | | |
| One Group of the following: | | |
| | | |
| 305A - I | Business Administration - II(I) | 4 |
| 306A - I | Business Administration - III(I) | 4 |
| | | |
| 305B - I | Banking and Finance - II(I) | 4 |
| 306B - I | Banking and Finance - III(I) | 4 |
| | | |
| 305E - I | Cost and Works Accounting - II(I) | 4 |
| 306E - I | Cost and Works Accounting - III(I) | 4 |
| | | |
| 305G - I | Business Entrepreneurship - II(I) | 4 |
| 306G - I | Business Entrepreneurship - III(I) | 4 |
| | | |
| 305K - I | Insurance, Transport and Tourism - II(I) | 4 |
| 306K - I | Insurance, Transport and Tourism - III(I) | 4 |
| | | |
| Compulsory Subject: | | |
| IPRL | Intellectual Property Rights Laws | 1 |

T.Y.B.Com. Semester-VI

| Code | Subject | Credits |
|---|---|---|
| Compulsory Subjects: | | |
| 301 - II | Business Regulatory Framework - I | 3 |
| 302 - II | Advanced Accounting - I | 3 |
| 303 - II | Indian and Global Economic Development - I | 3 |
| 304 - II | Auditing & Taxation - I | 4 |
| | | |
| One Group of the following: | | |
| | | |
| 305A - II | Business Administration - II(II) | 4 |
| 306A - II | Business Administration - III(II) | 4 |
| | | |
| 305B - II | Banking and Finance - II(II) | 4 |
| 306B - II | Banking and Finance - III(II) | 4 |
| | | |
| 305E - II | Cost and Works Accounting - II(II) | 4 |
| 306E - II | Cost and Works Accounting - III(II) | 4 |
| | | |
| 305G - II | Business Entrepreneurship - II(II) | 4 |
| 306G - II | Business Entrepreneurship - III(II) | 4 |
| | | |
| 305K - II | Insurance, Transport and Tourism - II(II) | 4 |
| 306K - II | Insurance, Transport and Tourism - III(II) | 4 |
| | | |
| Compulsory Subject: | | |
| CA | Computerised Accounting | 1 |

तृतीय वर्षास Advanced Accounting आणि Cost and Works Accounting या विषयाच्या अभ्यास साहित्याचे आणि परीक्षेचे माध्यम फक्त इंग्रजी असेल.

— — —　　— — —　　— — —

## ९.४ विषय निवडण्याबाबत सूचना – एम.कॉम.

**प्रथम वर्ष एम.कॉम.**

| | |
|---|---|
| अनिवार्य विषय | Management Accounting and Financial Analysis and Control |
| कोणताही १ विषय | Strategic Management and Industrial Economics /<br>Strategic Management and Business Statistics |
| कोणताही १ विषय गट | Advanced Accounting & Taxation / Commercial Laws & Practices / Advanced Cost Accounting & Cost system / Co-operation & Rural Development / Business Practices & Environment / Business Administration / Advanced Banking & Finance / Advanced Marketing |

**द्वितीय वर्ष एम.कॉम.**

| | |
|---|---|
| अनिवार्य विषय | Business Finance And Capital Market and Financial Services |
| कोणताही १ विषय | Research Methodology for Business And Industrial Economic Environment /<br>Research Methodology for Business & Operations Research<br>(प्रथम वर्षास जो विषय निवडलेला आहे तोच विषय द्वितीय वर्षास लागू राहील.) |
| कोणताही १ विषय गट | Advanced Accounting & Taxation / Commercial Laws & Practices / Advanced Cost Accounting & Cost system / Co-operation & Rural Development / Business Practices & Environment / Business Administration / Advanced Banking & Finance / Advanced Marketing (प्रथम वर्षास जो विषय गट निवडलेला आहे तोच विषय गट द्वितीय वर्षास लागू राहील.) |

Management Accounting and Financial Analysis and Control, Business Statistics, Advanced Accounting & Taxation, Advanced Cost Accounting & Cost system, Financial Management and Elements of Knowledge Management या विषयाच्या अभ्यास साहित्याचे आणि परीक्षेचे माध्यम फक्त इंग्रजी असेल.

— — —    — — —    — — —

## शाळा सोडल्याचा दाखला / स्थानांतर / स्थलांतर / बोनाफाइड प्रमाणपत्र जमा करण्याबाबतचे हमीपत्र

दिनांक / ___ / ___२०२६

प्रति,
मा. संचालक,
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे

**विषय: प्रथम वर्ष परीक्षा अर्ज जमा करण्याबाबत...**

मी ______________________________________________ विनंतीपूर्वक अर्ज करतो/करते

की मी आपल्या केंद्रामध्ये प्रथम वर्ष बी.ए./बी.कॉम./एम.ए./एम.कॉम./एम.बी.ए. या वर्गामध्ये प्रवेश घेण्यासाठी अर्ज केला असून माझा परीक्षा अर्ज क्र. ________________________ आहे. अर्जासोबत जमा करावयाचे शाळा सोडल्याचा दाखला / स्थानांतर / स्थलांतर / बोनाफाइड प्रमाणपत्र माझ्याकडे सध्या उपलब्ध नसून ते मिळविण्यासाठी मी अर्ज केलेला आहे. सदर प्रमाणपत्र मी अभ्यास केंद्रावर विहित मुदतीत जमा करेन. सदर प्रमाणपत्र जमा केल्यानंतरच माझा प्रवेश निश्चित होईल, याची मला माहिती आहे. तरी, कृपया माझा प्रवेश अर्ज स्वीकारण्यात यावा, ही विनंती.

विद्यार्थ्यांची सही ____________________

______________________________________

विद्यार्थ्याचे नाव:

---

For Study Centre use only

Sign of Study Centre Coordinator:______________________________

Stamp of Study Centre

---

# परीक्षा अर्जावरील विद्यार्थी माहितीत दुरुस्ती करावयाचा अर्ज

दिनांक / ___ / ___२०२६

प्रति,
मा. संचालक,
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे

**विषय: प्रथम वर्ष परीक्षा अर्जावरील विद्यार्थी माहितीत दुरुस्ती करण्याबाबत...**

मी ____________________________________________ विनंतीपूर्वक अर्ज करतो/करते

की मी आपल्या केंद्रामध्ये प्रथम वर्ष बी.ए./बी.कॉम./एम.ए./एम.कॉम./एम.बी.ए. या वर्गामध्ये प्रवेश घेण्यासाठी अर्ज केला असून माझा परीक्षा अर्ज क्र. ____________________ आहे. त्यावरील माझ्या माहितीत पुढीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी, ही विनंती.

| तपशील | छापील परीक्षा अर्जामध्ये असलेली माहिती | माहितीत करावयाची दुरुस्ती |
|---|---|---|
| विद्यार्थ्याचे नाव | | |
| पत्ता | | |
| मोबाईल क्रमांक | | |
| इमेल आयडी- | | |
| माध्यम | | |
| विषय | | |

विद्यार्थ्याची सही ____________________

---

For Study Centre use only

Sign of Study Centre Coordinator:______________________________

Stamp of
Study Centre

---